# श्री. किसनुजी नारायणजी टाकळीकर

सेवक क्र. ०६ आदर्श विणकर कॉलनी, तांडापेठ, नागपूर

**मी उपासक का झालो ?**

मी भगवान बाबा हनुमानजी व महानत्यागी बाबा जुमदेवजी यांना प्रणाम करुन या मार्गावर येण्याचे कारण व घडलेले प्रत्यक्ष अनुभव सादर करीत आहे.

अनेक देवांची पूजा करुन व मंत्र, तंत्र तसेच औषधोपचारे करुन सुध्दा आमच्या कुटुंबात असलेले दुःख दूर होत नव्हते. त्यापासून आम्हाला काहीच लाभ मिळत नव्हता. आम्ही हताश झालो होतो. माझी मोठी मुलगी पुष्पा ही दीड वर्षाची असताना तिला अतिशय त्रास होता. तिला उठणे-बसणे सुध्दा होत नव्हते व ती मरणासन्न स्थितीत होती. तिचे डोळे खोल गेलेले दिसत होते. त्यामुळे आम्हाला वाटत होते की, ही मुलगी आमच्यातून निघून तर जाणार नाही ना? अशी परिस्थिती असताना एके दिवशी श्रीमान मारोतराव ठुब्रीकर हे काही कारणास्तव आमच्या घरी आलेत. त्यांनी त्या मुलीची व्यथा पाहून मुलीला काय झाले याची चौकशी केली. तेव्हा आम्ही बरेच दिवसापासून या मुलीला त्रास होत आहे. पुष्कळ उपाय केले. डॉक्टरांचे औषधही दिले. तंत्रमंत्राचा उपाय केला तरी सुध्दा या मुलीचा त्रास दूर होत नाही असे सांगितले. त्यामुळे हताश झालो आहोत. यावर त्यांनी आम्हाला एक उपाय सांगितला आणि एका परमेश्वराच्या कृपेबद्दल मार्गदर्शन केले व श्रीमान गंगारामजी रंभाड यांच्याकडे गेलो. त्यांनी आम्हाला सर्व विचारपूस केली. आमचे दुःख ऐकल्यानंतर त्यांनी मला बाबा हनुमानजीच्या फोटोसमोर अगरबत्ती लावून विनंती करायला सांगितले.

त्याच्या मार्गदर्शनाप्रमाणे आम्ही गंगारामजी रंभाड यांच्या घरी जाऊन भगवान बाबा हनुमानजीच्या फोटोसमोर अगरबत्ती लावून विनंती केली. तीन दिवसांतच मुलीच्या प्रकृतीत फार सुधारणा झाली. नंतर आम्ही सहा महिने सतत त्यांच्याकडे जाऊन दररोज अगरबत्ती लावत होतो. या सहा महिन्यांच्या कालावधीत मुलीची प्रकृती सुधारली आणि ती हिंडू फिरु लागली. आम्ही सर्व सुखी झालो. तसेच आमच्या प्रपंचात सुध्दा सुखसमाधान नांदू लागले. त्यानंतर श्रीमान गंगारामजी रंभाड यांच्यासोबत महानत्यागी बाबा जुमदेवजी यांच्याकडे गेलो. त्यांना सर्व हकीकत सांगितली व बाबांना फोटो देण्याबद्दल विनंती केली. बाबांनी आम्हाला भगवान बाबा हनुमानजीचा फोटो दिला व सांगितले की, ''अपने कुटुंब मे आजीवन प्रेमसेही बर्ताव

करना पडेगा.'' त्याप्रमाणे आम्ही भगवान बाबा हनुमानजीचा फोटो घेऊन महानत्यागी बाबा जुमदेवजी यांच्या उपस्थितीत हवनकार्य केले. याप्रमाणे आम्ही या मार्गावर पक्के झालो. तेव्हापासून आम्ही आपल्या कुटुंबात सत्य, मर्यादा व प्रेमाने वागत आहोत.

* * * * *